जाक्र/सनिभो/कक्ष-1/आउ/उविदु/पाशिपत सं/ 523 /2013
कार्यालयः- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता भोकरदन, दिं. 25/10 /2013

वाचा :-

1. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम 1960 चे कलम 13 (1) मधील तरतूद.
2. सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे आदेश क्र.सीएसएल-1493/1162/सीआर-47/15-सी दिं. 7 ऑगस्ट 1993.
3. पाराशर शिक्षक सहकारी पतसंस्था म.भोकरदन ता. भोकरदन, जि जालना.
   या संस्थेच्या दिं. 29 / 03 /2013 रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. (02).

ज्ञापन :-

पाराशर शिक्षक सहकारी पतसंस्था म.भोकरदन ता. भोकरदन, जि जालना., या संस्थेच्या दिं. 29/3/2013 झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. (02) नुसार संस्थेने दिं 29-3-2013 अन्वये संस्थेस आदर्श उपविधी लागू करुन घेणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम 1960 चे कलम 13 (1) मधील तरतूद वाचा क्र.2 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, मी एस डी देवरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता भोकरदन, जि जालना पाराशर शिक्षक सहकारी पतसंस्था म.भोकरदन ता. भोकरदन, जि जालना. या संस्थेस आदर्श उपविधी लागू करणे बाबत खालीलप्रमाणे उपविधी दुरुस्ती मंजूर करीत आहे.

अक्र	सध्याचे उपविधी क्रमांक	दुरुस्तीनंतरचा उपविधी क्रमांक	मंजुर / नामंजुर	शेरा
1	सध्याची जुनी उपविधी नियमासह	नविन आदर्श उपविधी नियमासह	मंजुर	मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या पत्र जाक्र/ प्रशासन/97वी घदुसुधारणा/102/2013 दिं.22/02/2013 अन्वये असे आदेशित केले आहे की, 97 व्या घटनादुरुस्ती अनुषंगाने सहकार कायद्यात करण्यात आलेल्या सुधारणांशी सुसंगत आदर्श उपविधी लागू करुन घेण्याबाबत आदेशित केल्यानुसार.

सदरील ज्ञापन पुरवणी क्रमांक (4) सह संस्थेच्या आदर्श उपविधीस यावे.

(एस डी देवरे)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था भोकरदन

प्रति,

1. चेअरमन/सचिव, पाराशर शिक्षक सहकारी पतसंस्था म.भोकरदन ता. भोकरदन, जि जालना.यांना देवून कळविण्यात येते की, सदरील ज्ञापन पुरवणी क्रमांक 4 सह संस्थेच्या आदर्श उपविधीस जाडण्यात यावे.
2. मा.जिल्हा उपनिबधंक, सहकारी संस्था,जालना यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. लेखापरिक्षक, श्रेणी-2, सहकारी संस्था ता भोकरदन यांना माहितीस्तव रवाना.
4. शाखाधिकारी, जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.शाखा,भोकरदन, यांना माहितीस्तव रवाना

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था ता भोकरदन

पुरवणी क्र.४

दिनांक २९/०३/२०१३ रोजी भरलेल्या विशेष साधारण सभेच्या ठरावाने मंजुर झालेल्या दुरुस्त उपविधीची नक्कल

दुरुस्त झालेल्या उपविधीचा अनुक्रम क्रमांक	दुरुस्त झाल्यानंतर होणाऱ्या उपविधिची शब्द योजना
	श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था म. भोकरदन ता.भोकरदन जि.जालना ची नविन आदर्श उपविधी नियमासह ज्ञापन /जा. क्र. /525/सानिभो/प्र.१/....... दि. 25-10-2013 अन्वये मान्य व नोंदविले. सहायक निबंधक सहकारी संस्था ता.भोकरदन सहायक निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र शासन सत्यमेव जयते तालुका भोकरदन

सचिव

समिती सदस्य

सभापती

(र.न.जे.एल.एन./बी.डी.एन./बी.के.एन./८०१ दिनांक :- २५/१०/१९८३)

श्री पाराशर शिक्षक सहकारी पतसंस्था म.
भोकरदन ता. भोकरदन जि.जालना

आदर्श -उपविधी

श्री पाराशर शिक्षक सहकारी पतसंस्था म. भोकरदन ता. भोकरदन जि.जालना

आदर्श -उपविधी

अ प्रस्तावना

<u>अ.१.१. संस्थेचे नाव व तिचा नोंदविलेला पत्ता.</u>

संस्थेचे नाव श्री पाराशर शिक्षक सहकारी पतसंस्था म. भोकरदन ता. भोकरदन जि.जालना असे आहे. व तिचा नोदंलेला पत्ता-गाव भोकरदन पोष्ट भोकरदन ता.भोकरदन ता.भोकरदन जि.जालना.आहे.

<u>अ.१.२ संस्थेच्या पत्त्यात झालेला बदल.</u>

<u>पत्ता बदल</u> : नोंदविलेल्या पत्त्यात झालेला कोणताही फेरबदल, असा फेरबदल झालेल्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत नोंदणी अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३७ अन्वये कळविला पाहिजे. असा झालेला बदलाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३१ मधिल तरतुदीनुसार कार्यवाही केली पाहिजे उपविधी दुरुस्ती प्रस्तावासह निबंधकाचे पूर्व परवानगीने पत्त्यातील बदल केला पाहिजे.

<u>कार्यक्षेत्र</u>

भोकरदन तालुका.

<u>अ-१.३</u> <u>व्याख्या</u> संस्थेचे मुख्य वर्गीकरण साधन संपत्ती संस्था (रिसोर्स सोसायटी) आणि उपवर्ग कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था (क्रेडीट रिसोर्स सोसायटी) असा राहिल.

<u>१.</u> या उपविधीमध्ये जेथे अधिनियम व नियम असा उल्लेख करण्यात आलेला आहे. तेथे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले नियम महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ असे समजले जाईल.

<u>२.</u> **शासन** म्हणजे महाराष्ट्र शासन

<u>३.</u> **निबंधक** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार नेमण्यात आलेला सहकारी संस्थांचा निबंधक ही व्यक्ती होय.

<u>४.</u> **सभासद** म्हणजे संस्थेने नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणी नंतर ज्यांना उपविधीतील तरतुदीनुसार सभासदत्व देण्यात आले आहे अशी व्यक्ती.

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

५. संस्था म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार नोंदलेली संस्था होय.

६. उपविधी म्हणजे श्री पाराशर शिक्षक सहकारी पतसंस्था म. भोकरदन संस्थेचे उपविधी.

७. सचिव / व्यवस्थापक / महाव्यवस्थापक / कार्यकारी संचालक / मुख्यकार्यकारी अधिकारी व्यवस्थापक समितीने नेमणूक केलेली पगारी व्यक्ती.

८. तज्ञ संचालक याचा अर्थ बँकींग , व्यवस्थापन , वित्तसंस्था या क्षेत्रातील अनुभव असलेली व्यक्ती. असा आहे, आणि त्यामध्ये संस्थेने हाती घेतलेले उद्दिष्टे व कार्य यांच्याशी संबंधीत अन्य कोणत्याही क्षेत्रातील विशेषज्ञता धारण करणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो.

९. कार्यलक्षी संचालक याचा अर्थ व्यवस्थापक/सचिव किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी माग तो कोणत्याही पदनामाने संबोधण्यात येवो असा आहे. आणि त्यामध्ये समितीने नामनिर्देशत केलेल्या संबंधीत संस्थेच्या कोणत्याही विभागप्रमुखाचा समावेश होतो.

१० थकबाकीदार म्हणजे ९० दिवसापेक्षा अधिक कालावधी करिता थकित किंवा तीन मासिक हप्ते थकितअसनारी कर्जदार व्यक्ती तसेच सदर कर्जास जामिन असनारी व्यक्ती.

ब उदेश

ब.१.१ संस्थेचे उदेश पुढील प्रमाणे आहेत.

अ) सदस्यांमध्ये काटकसर ,स्वावलंबन व सहकार यांचा प्रसार होण्यास उत्तेजन देणे.

ब) भागभांडवल स्विकारणे , सभासदांकडून ठेवी स्वीकारणे.

क) बाहेरील कर्ज काढणे किंवा निधी उभारणे.

ड) सभासदास जामीनावर कर्ज देणे व वसुली करणे.

इ) संस्थेच्या उपयोगासाठी मालकी हक्काने किंवा भाड्याने जागा किंवा इमारत खरेदी करणे.

फ) सहकारी कायदा कलम २० व २० अ* अंतर्गत संस्थांची भागीदारी व संस्थांकडून सहयोगी करता येईल.

ग) सभासदांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी विविध उपक्रम हाती घेणे. उपरोक्त सर्व किंवा एखादा उद्देश साधण्यासाठी लागणारी अनुषंगिक सर्व कामे करणे.

सचिव
चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत
संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

क निधी

क.१.१. संस्थेचे निधी खाली दिलेल्या मार्गांनी उभारले जातील.

१. भाग विक्री

२. प्रवेश फी

३. वर्गणी

४. सभासदांकडून ठेवी

५. कर्ज

६. देणग्या व बक्षीसे

७. आर्थिक सहाय्य.

क.१.२ व्यवस्थापक समितीने ठरविलेल्या मुदतीकरीता निश्चित केलेल्या व्याजाच्या दराने ठेवी स्विकारता येतील. परंतु अशा जबाबदारीची एकूण रक्कम महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ३५ मध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये.

क.१.३ अधिकृत भागभांडवल

१. प्रतेक भागाची दर्शणी किमंत रु /५० राहिल एकुण भाग भांडवलाची मर्यादा रु.६ कोटी राहिल तसेच एकुण भागाची संख्या १२ लाख राहिल. प्रतेक भागाची वर भाग अदा केले जाईल .ठरल्या प्रमाने भागाचे हप्ते भरले न गेल्यास भागाकरिता भरलेली रक्कम जप्त होण्यास पात्र राहिल.

२. प्रतेक सदस्याने २००० रु / दरमहा वर्गणी भरली पाहिजे.रक्कम जमा झाल्यावर त्याचे रुपांतर ठेवीत करण्यात येईल. .रुपांतर केल्याच्या तारखे पासुण व्याज मिळण्यास पात्र राहिल.

३. संस्थेच्या एकुण भागाच्या १/५ भागापेक्षा अगर रुपये ६५ हजार पेक्षा जास्त किंमतीचे भाग कोणाही सदस्यास धारन करता येणार नाहीत अगर त्यावर हक्क सांगता येणार नाही.

ड.१.१ सभासदत्वासंबंधी पात्रता

कोणत्याही व्यक्तीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २२* प्रमाणे खालील अटींची पूर्तता केल्याशिवाय सभासद होता येणार नाही.

१. भोकरदन तालुक्यातील जालना जिल्हा परिषदेच्या शाळेत काम करनाऱ्या कोणत्याही शिक्षकास संस्थेचे सदस्य होता येईल.मात्र या संस्थेच्या कार्यक्षेत्रात एखादी याच प्रकारची संस्था असल्यास अगर स्थापण झाल्यास तिचे कार्यक्षेत्र या संस्थेच्या कार्यक्षेत्रातुन वगळले जाईल . संस्थेचे कार्यक्षेत्र भोकरदन तालुका राहील.

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

२. अधिनियम , नियम व उपविधी यातील अटींची पूर्तता त्याने केली पाहिजे.

३. भारतीय करार कायदयानुसार करार करण्यास पात्र असला पाहिजे.

४. त्याने १५१/- रु. प्रवेश फी व किमान एका भागाची पूर्ण किंमत भरली पाहिजे.

५. तो चांगल्या वर्तुनुकीचा असला पाहीजे .

६. संस्थेचे उददेश त्यास समजले ले पाहीजेत .

७. त्याचा सदस्य होण्या बददलचा लेखी अर्ज समितीतील एकुण सदस्यांच्या निम्याहुण अधीक बहुमताने मंजुर केला असला पाहीजे .

८. तो जालना जिल्हा परिषदेच्या कायम सेवेत शिक्षक म्हणुन (नौकरीत.) असला पाहीजे .

९. तो समान उध्देश असलेल्या इतर संस्थेचा सदस्य नसला पाहिजे.

१०. त्याचे वेतन अदा करना-या अधिका-यास त्याचे वेतनातुन संस्थेच्या कर्जाची ,वर्गणीची व इतर रक्कम कापुन घेन्यास लेखी अधिकार पत्र (परत घेता न येईल असे) लिहुन दिले असले पाहिजे.

क्रियाशिल सभासद

क्रियाशिल सभासाद म्हणजे जो सभासद संस्थेच्या खालील बाबी पूर्ण करीत असलेले सभासद हे क्रियाशिल सभासद असतील.

अ) सदर सभासदाची संस्थेच्या मागील सलग ५ वर्षातील एका अधिमंडळाच्या वार्षीक सभेरा उपस्थिती असली पाहिजे.

ब) संस्थे बरोबर सदर सभासदाची मागील सलग ५ वर्षामध्ये किमान एकदा संस्थेकडून कर्ज घेतलेले असले पाहिजे किंवा संस्थेत ठेव ठेवलेली असली पाहिजे. ठेव व्यवहार / वर्गणी (भागभांडवल) या मागील सलग ५ वर्षामध्ये सलग एक वर्षाकरीता संस्थेच्या खेळत्या भांडवलाप्रमाणे खालीलप्रमाणे असणे आवश्यक राहिल.

क) तो संस्थेचा थकबाकीदार नसला पाहिजे.वथकबाकीदार सभासदास जामिन नसला पाहिजे

अ- ठेव भांडवल आणि दोन्ही मिळून-

अ.क्रं.	संस्थेचे खेळते भांडवल	किमान ठेवी / वर्गणी (भागभांडवल) अथवा दोन्ही मिळून
१	रु. १० लाखा पर्यंत	रु. १०००/-
२	रु. १० लाखापेक्षा जास्त आणि रु. १ कोटी पर्यंत	रु. २५००/-
३	रु. १ कोटी व त्यापेक्षा जास्त आणि रु. १० कोटी पर्यंत	रु. ५०००/-
४	रु. १० कोटी आणि त्यापेक्षा जास्त आणि रु. १०० कोटी पर्यंत	रु. १००००/-
५	रु. १०० कोटीपेक्षा जास्त	रु. २५०००/-

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

किंवा

ब- क्रियाशिल नसलेला व थकबाकीदार सभासदास संस्थेच्या व्यवहारात मतदानाचा अधिकार असणार नाही.

ड.१.२ सभासदत्वासंबंधी अपात्रता :-

कोणतीही व्यक्ती खालील कारणास्तव संस्थेची सभासद होण्यास अपात्र राहिल.

१. दिवाळखोर ठरवून घेण्याकिरता अर्ज केला असल्यास किंवा दिवाळखोर असल्यास.

२. एखाद्या फौजदारी गुन्हायाबद्दल (नैतिक अध:पतनाच्या गुन्हायासह) शिक्षा झाली असल्यास व जी रद्द किंवा माफ केली नसेल, परंतु अशा शिक्षेची मुदत संपल्यापासून ५ वर्षाचा काळ असल्यास सदर अपात्रता लागू होणार नाही.

ड.१.३ सभासद दाखल करुन घेण्याची कार्यपध्दती :-

१. विहीत नमुन्यात अर्ज दिलेला असावा.

२. प्रवेश फी व एक किंवा अधिक भागाची मागणी केली पाहिजे व संस्थेकडे संपुर्ण रक्कम भरली पाहिजे.

३. सभासद होण्यासाठीचा अर्ज संचालक मंडळाने सभे मध्ये ठराव करुन मंजुर केला पाहिजे.

४. सभासद म्हणुन दाखल करुन घेण्यास नकार देणाऱ्या संस्थेच्या निर्णयामुळे व्यथीत झालेल्या व्यक्तीस निबंधकाकडे अपील दाखल करता येईल.

ड.१.४ भाग दाखला :-

संस्थेने प्रतेक सभासदास भाग दाखला दिला पाहिजे. अशा दिलेल्या भाग दाखल्यवर भागांची संख्या आणि धारण भागाचा सलग अनुक्रमांक दिला पाहिजे. भाग दाखल्यावर संस्थेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापक/ सचिव दोघांच्या सह्या असल्या पाहीजे .अशा दिलेल्या भाग दाखल्यावर संस्थेचे सिल(Seal) असले पाहिजे.

ड.१.५ भागांचे हस्तांतरण :-

१. भाग हस्तांतरण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २९ व ३० आणि त्याखाली केलेल्या नियम २४ व नियम २५ नुसार केले जाईल.

२. संचालक मंडळाच्या संमतीने सभासदाला ज्याच्या नावावर हस्तांतर करावयाचे आहे असे भाग एक वर्ष धारण केल्या नंतर हस्तांतर करता येईल.

३. ज्याच्या नावर भाग हस्तांतर करावयाचे आहे अशा इसमाचे नाव भाग हस्तांतर नोंदणी पुस्तकात दाखल केल्या खेरीज आणि प्रतेक हस्तांतरासाठी रु.१०० /- शुक्ल दिल्याखेरीज कोणतेही हस्तांतरण पुर्ण असे समजण्यात येनार नाही.

४. संस्थेला देय असणाऱ्या सर्व दयित्वाची हस्तांतरण करणा-याने फेड केली पाहीजे.

ड.१.६ सभासदत्व बंद होणे. :-

सभासदत्व सहकार कायदा कलम २५ मधिल कारणाने संप्पुष्टात येइल.

१) सभासदाचा मूत्यू झाल्यास.

२) कायमचे वेड लागल्यास.

सचिव चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

३) राजिनामा दिल्यानंतर तो मंजुर झाल्यास.

४) सर्व भाग हस्तांतर केल्यास.

५) क्रियाशिल नसलेला सभासद महाराष्ट्र अधिनियम १९६० चे कलम ३५ अंतर्गत काययात विहीत केलेल्या कलावधी नंतर काुन टाकण्यात येइल.

६) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३५ व त्याखालील नियम २८ व २९ यातील तरतुदी नुसार काढुन टाकल्यास.

७) संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर तो नेहमी राहत असल्यास.

८) जिल्हा परिषदेच्या सेवेतुन कायमपणे तो मुक्त अगर कमी झाल्यास.

ड.१.७ सभासदत्वाचा राजिनामा :-

सभासद सचिवास तिन महिन्याची लेखी नोटीस देऊण कोणत्याही सभासदा आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देवुन स्वताः चे भाग भांडवल संचालक मंडळाचे संमतीने परत घेवु शकेल मात्र तसे करण्यापुर्वी त्यांचेकडे येणे असलेल्या रकमाची फेड झालीअसली पाहीजे. जामिनदार म्हणुन देय जबाबदारी पुर्ण परतफेड झालेली असावी परंतु अशा सभासदत्व रदद झालेल्या सभासदास व्यावस्थापक समितीने त्याचा राजीनामा स्विकारण्याच्या तारखेपासुन ५ वर्ष पुर्ण होईपर्यन्तं संस्थेत पुन्हा सभासद म्हणुन प्रवेश मिळणार नाही.

ड.१.८ सभासदाची हकालपट्टी :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३५ आणी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २८ व २९ च्या तर्तुदिस अधिन राहुन सभासदाची खालील कारणास्तव हकालपट्टी करण्यात येईल.

१ त्याने जानुन बुजुन संस्थेस फसविले असल्यास.

२ तो दिवाळखोर किंवा कायदयाने अपात्र झाल्यास.

३ त्याने हेतुपुरस्कर केलेल्या कृतुने संस्थेच्या प्रतीष्टेस बाधा आणल्यास.

४ सभासद हा क्रियाशिल सभासद न राहील्यास.

५ जर त्याने लागोपाठ ३ महिन्यांची वर्गणी थकविली असेल्यास.

६ जिल्हा परिषदेच्या सेवेतुन कायमपणे तो मुक्त अगर कमी झाल्यास.

ड.१.९ हकालपट्टी केलेल्या सभासदाला पुन्हा प्रवेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३५ (२) च्या तरतुदीस अधिन राहुन हकालपट्टी केलेल्या सभासदास पुन्हा दाखल करुन घेता येनार नाही.

ड.१.१० व्यक्तीचे नामनिर्देशन करणे :-

कलम ३० च्या पोटकलम १ अन्वये आपल्या शेअरचे किंवा हितसंबधाचे हस्तांतरण करण्यासाठी एखादया संस्थेच्या सदस्याला त्याने सही केलेल्या दस्तऐवजाव्दारे किंवा संस्थेने त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या कोणत्याही पुस्तकात निवेदन देवुन कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना नामनिर्देशन करता येईल

सचिव चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

२ पोटकलम १ (१)अन्वये केलेले नामनिर्देशन ,त्या पोटनियमा नुसार केलेल्या दुसऱ्या कोणत्याही नामनिर्देशनाव्दारे रदद करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल.

३. (एक) एखादया संस्थेच्या एखादया सदस्याने कोणतेही नामनिर्देशन केलेले नसेल त्या बाबतीत सदस्य मरण पावल्यास संस्था तिच्या कार्यलयात प्रदर्शित केलेल्या जाहिर नोटीशी व्दारे , मृताच्या शेअरच्या किंवा हितसंबंधाच्या प्रस्तावित हस्तांतरणाबाबत कोणाचाही दावा किंवा हरकत असल्यास , नोटीशी व्दारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीमध्ये तो सादर करण्यास सांगेल.

(दोन) अशा नोटीशीस अनुसरुन किंवा अन्य प्रकारे मिळालेले दावे किंवा हरकती विचारात घेतल्या नंतर आणि चालू परिस्थितीत समितीला योग्य वाटेल अशी चौकशी केल्या नंतर समिती तिच्या मते मृत्यु सदस्याचा वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी असेल अशी व्यक्ती ठरविल आणि कलम ३० अन्वये उपाय योजना करील.

कलम ३० पोटकलम (१) च्या प्रयोजनासाठी नामनिर्देशीत केलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नाव आणि पत्ता आणि असे नामनिर्देशन रद्द करणे किंवा त्यात फेर बदल करणे हे नियम ३२ खाली ठेवण्यात आलेल्या नोंदवहित नमुद करण्यात येईल.

<u>ड.१.११ सभासदांची जबाबदारी आणि सदस्य मृत सदस्यांच्या मालमत्तेवर जबाबदारी :-</u>

सभासदांची जबाबदारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३३ च्या तरतुदीस पात्र राहुन खालील प्रमाणे राहील. मात्र वैयक्तीक कर्जाची जबाबदारी कर्ज पुर्ण परतफेड होई पर्यंत राहिल.

१. संस्थेच्या सभासदाची जबाबदारी त्यांच्या नावे असलेल्या भागाच्या किमंती इतकी मर्यादीत राहिल. परंतू सामुदायिक जबाबदारी संस्थेच्या सर्व सभासदाची असेल.

२. माजी सभासदांच्या बाबतीत ज्या तारखेस त्यांचे सभासदत्व संपुष्टात आले असेल त्या तारखेपर्यंत संस्थेची जी कर्जे असतील त्या कर्जासंबंधीची जबाबदारी अशा तारखेपासून दोन वर्षे मुदतीपर्यंत राहिल.

३. मृत सभासदाची , तो मृत पावला त्या तारखेस संस्थेची जी कर्जे देणे असतील त्या कर्जा संबंधी जबाबदार अशा तारखेपासुन दोन वर्षाच्या मुदती पर्यंत चालू राहिल. मात्र वैयक्तीक कर्जाची जबाबदारी पुर्ण फेड होई पर्यंत राहिल.

<u>ड.१.१२ सभासदांचे भागभांडवल , लाभांश व ठेवीवरील संस्थेचा अग्रहक्क :-</u>

सभासदाकडून अगर माजी सभासदांकडून संस्थेचे येणे असेल तर त्यापोटी संस्थेत सभासदाच्या असलेल्या भागावर, लाभांशावर व ठेवीवर संस्थेच्या प्रथम अग्रहक्क व बोजा राहिल. संस्था केव्हाही सभासदाच्या जबाबदारीपोटी त्यास देय असलेली रक्कम वळती करुन घेईल.

<u>ड.१.१३ सभासदाचा मृत्यु :-</u>

सभासदाचे मृत्युनंतर संचालक मंडळास जो त्याचा कायदेशीर वारस अथवा प्रतिनिधी आहे. अशी खात्री असेल त्यास संस्था रक्कम देईल. मात्र आवश्यक तो नुकसान भरपाईचा करार करुन घेऊन रक्कम दिली जाईल. अशा रक्कमेत भाग भांडवल, लाभांश, ठेवी व त्यावरील

र.नं. JLN/BDN/ BKN / 801 दि.25/10/83

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

व्याज अथवा कोणत्याही प्रकारची मयत सभासदास देय असलेली रक्कम याचा समावेश होईल अशी रक्कम देताना संस्थेची येणे असलेली रक्कम वजा केली जाईल.

ड.१.१४ मयत सभासद कर्ज वसूली :-

संस्थेने मयत सभासद कर्जनिवारण निधी नावाचा निधी उभारला पाहिजे अशा उभारलेल्या निधीतुन संस्थेच्या कर्जाचे हप्ते नियमित भरणारा एखादा सभासद मयत झाल्यास व त्याच्यावर संस्थेचे कर्ज बाकी रहात असल्यास त्याच्या शेअर्स व ठेवीची रक्कम त्याच्या कर्जात जमा करुन उर्वरीत राहिलेले कर्ज मयत सभासद कर्ज निवारण निधीमधुन १०० % जमा करून घेतले जाईल. मात्र त्या मयत सभासदाने आजारी रजेच्या कारणाशिवाय तीन कर्जाचे हप्ते थकविलेले नसले पाहिजे. शाळेवर उपस्थित राहुन नियमीत पगार घेणाऱ्या व नियमीत कर्जाचे हप्ते कपात न करणाऱ्या मयत सभासदास या योजनेचा लाभ मिळणार नाहि. या योजनेसाठी दर वर्षी वर्षा अखेर काही प्रमाणात निधी उभारुन तरतुद केली पाहिजेत.

इ - सभा

इ१.१ अधिमंडळाची पहिली सभा :-

संस्थेच्या **अधिमंडळाची पहिली सभा** संस्थेची नोंदणी करण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्याचे आत संस्थेचे मुख्य प्रवर्तक हे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ५९ च्या तरतुदीस अधीन राहुन बोलवतील. **अधिमंडळाची पहिल्या सभेत** खालील विषया बाबत कामकाज केले जाईल.

१. सभेसाठी अध्यक्षाची निवड करणे.

२. नविन सदस्य दाखल करुन घेणे.

३. हिशोब पत्रके स्विकारणे आणि सभेच्या तारखेपासून १४ दिवस अधी प्रवर्तकांनी केलेल्या सर्व व्यवहारा बाबत इतिवृत्त सादर करणे.

४. उपविधी अन्वये रितसर निवडणूका घेण्यात येईपर्यंत हंगामी संचालक मंडाळाची रचना करणे, उपविधीस अनुसरुन निवडलेल्या संचालक मंडळाला जे अधिकार व कर्तव्ये असतील तेच अधिकार हंगामी संचालक मंडळास असतील.

५. ज्या मर्यादेपर्यंत पैसा कर्जाऊ घेता येईल ती मर्यादा निश्चित करणे.

६. उपविधीत विशेष करुन उल्लेख करण्यात आला आहे. अशी कोणतीही इतर बाब.

७. हंगामी समितीची मुदत १ वर्ष राहिल.

इ.१.२ अधिमंडळाच्या सभा व तिची कामे :-

१. संस्थेचे सहकार वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहिल.

२. सहकार वर्ष संपल्यापासून ४५ दिवसाचे आत संस्थेने वार्षिक हिशोबपत्रके तयार केली पाहिजे व वार्षिक हिशोब पत्रके तयार करणे आवश्यक व बंधनकारक आहे.

सचिव | चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. भोकरदन जि.जालना

३. संस्थेचे वार्षिक हिशोब पुरे करण्यासाठी आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या आत म्हणजेस दरवर्षी ३० सप्टेंबर पुर्वी सभासदाची **अधिमंडळाची वार्षिक** सभा बोलावली पाहिजे.

४. समितीने **अधिमंडळाच्या वार्षिक** सभेत दिलेल्या कर्जाच्या तपशील दर्शविणारे विवारण पत्र / झालेली कर्ज फेड, त्या वर्षा अखेरीस येणे असलेल्या रक्कमेचा तपशील, वार्षिक ताळेबंद व नफ्या-तोटयाचा हिशोब ठेवला पाहिजे.

५. **अधिमंडळाच्या वार्षिक** सभे पुढे समितीने संस्थेच्या कामकाजाची स्थिती / विशिष्ट रक्कम राखिव निधीमध्ये दारवविण्याचा हेतु असेल अशी रक्कम , लाभांश देण्याबद्दल शिफारस करील अशी रक्कम नमुद करील.

६. **अधिमंडळाच्या वार्षिक सभेत ताळेबंद** / नफातोटयाचा हिशोब, लेखापरिक्षकाने सदर केलेले लेखापरिक्षणाची ज्ञापण व समितीचा अहवाल मान्यतेसाठी ठेवला पाहिजे. तसेच पुर्वीचा लेखापरिक्षण दोष-दुरुस्ती अहवाल ठेवला पाहिजे.

७. संस्थेचा अध्यक्ष, त्यांच्या अनुपस्थित उपध्यक्ष किंवा त्या दोघांच्या अनुपस्थितीत सभेस उपस्थीत असलेल्या सदस्यांनी निवडलेला सदस्य सभेचे अध्यक्ष पद स्विकारील.

८. सभेस गणपुर्ती होण्यासाठी एकूण सदस्य संस्थेच्या १ /५ किंवा २५ या पैकी कमी असेल इतके सदस्य उपस्थित असणे अवश्यक आहे.

९. सचिव किंवा सभा बोलविणारा इतर अधिकारी सभा बोलविण्याची नोटीस आणि सभेची कार्यक्रम पत्रिका वाचून कार्यक्रम पत्रिकेत ज्या क्रमाने असतील त्या क्रमाने विषय विचारात घेण्यात येतील. अध्यक्षच्या परवानगीने त्यात बदल करण्याची संम्मती असेल.

१०. **अधिमंडळाच्या वार्षिक** सभेत ठराव उपस्थित असलेल्या क्रियाशिल सदस्यांच्या बहुमताने संम्मत करण्यात येईल. अध्यक्षास निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल.

११. जर गणपुर्ती अभावी **अधिमंडळाची वार्षिक** सभा भरविता आली नाही तर ती सभा त्याच दिवशी नंतरच्या वेळे एक तास अधिक नसेल अशा नंतरच्या वेळेपर्यंत नोटीस मध्ये नमुद केल्याप्रमाणे स्थगित करण्यात येईल. गणपुर्ती आभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी त्याच विषयावर एका तासानंतर घेण्यात येऊन सभेचे कामकाज पुर्ण केले जाईल. व अशा सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही. अशा रितीने स्थगित केलेल्या सभेस गणपुर्ती असो वा नसो मुळ सभेच्या कार्यक्रम पत्रिकेतील सर्व कामकाज निकालात काढण्यात येईल.

१२. संस्थांच्या सभासदास काढून टाकणे, समितीच्या सदस्याला दुर करणे किंवा उपविधीतील दुरुस्ती करणे त्या बाबत योग्य ती नोटीस देण्यात आल्याशिवाय **अधिमंडळाच्या वार्षिक** सभेपुढे हे विषय आणता येणार नाहीत.

१३. मागिल **अधिमंडळाच्या वार्षिक** सभेचे इतीवृत्त वाचून कायम करणे.

१४. वैधानिक लेखापरिक्षणासाठी शासन मान्य तालीकेवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

१५. मागील लेखापरिक्षणातील दोषांचे जाहिर वाचन करणे. व दोष-दुरुस्ती करणे व त्याची नोंद घेणे.

१६ अधिमंडळाच्या वार्षिक सभेची नोटीस १४ दिवस अगोर पाठविणे त्यामध्ये सभेची जगा, तारीख व वेळ याचा उल्लेख असला पाहिजे. नोटीशीवर व्यवस्थापक / सचिव यांची सही असेल.

१७. अधिमंडळाची वार्षिक सभा बोलविण्याची जबाबदारी संचालक मंडळाची राहिल.

१८. वार्षिक सभा मुदतीत घेण्यास कसूर करण्याऱ्या जबाबदार समिती सदस्यास पुढील ५ वर्षा करीता अपात्र ठरविण्यात येईल. तसेच जबाबदार सेवकांना रु. ५०००/- दंड करण्यात येईल.

१९. पुढील वर्षाचे अंदाजपत्रक मांडणे आणि नफा वाटणी करणे. तसेच उपविधी दुरुस्ती प्रस्ताव मांडणे.

२०. निबंधकास सादर केलेल्या / करावयाच्या वार्षिक विवरण पत्राची नोंद घेणे.

२१. संस्थेच्या होणाऱ्या / घ्यावयाच्या पंचवार्षिक निवडणूक तारखेची नोंद घेणे.

२२. नोकरा करीता सेवानियम,भविष्य निर्वाह निधीचे नियम तयार करणे, संस्था आपल्या कर्मचाऱ्यासाठी भविष्यनिधी (प्राव्हिडंड फंड) यासाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी यांचेकडे खाते उघडले जातील. या निधीची स्थापणा व त्याची व्यवस्था अधिनयम कलम क्रमांक ७१ व नियम क्रमांक ५६ मधील तरतुदीप्रमाण केले जाईल. व त्या भविष्य निर्वाह निधीस कर्मचारी भविष्य निधी अधिनियम १९५२ प्रमाणे अशा भविष्य निर्वाह निधीचे नियमनत्याअधिनियमान्वये केले जाईल.

इ.१.३ अधिमंडळाची विशेष सभा

अधिमंडळाची विशेष सभा खालील परिस्थितीत बोलविण्यात येईल.

अ. अध्यक्ष किंवा व्यवस्थापक समितीच्या मताधिक्याने अशी सभा किंवाही बोलविता येईल.

ब. संस्थेच्या सभासदांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ मधील तरतुदीनुसार एकपंचामांश सभासदांनी मागणी केल्यास.

क. कमल ७६ नुसार निबंधकाने सुचना केली असल्यास.

ड. संगिय संस्थेच्या संचालक मंडळाने सुचना केली असल्यास.

इ. **अधिमंडळाची** विशेष सभा बोलविण्याची सुचना कमीत कमी ७ दिवस अगोदर पाठविली पाहिजे.

वरील ब, क, ड व इ नुसार बोलवावयाची सभा अशा तऱ्हेने मागणी सुचना प्राप्त झाल्यापासुन १ महिन्याच्या आत बोलविण्यात येईल.

इ.१.४ अधिमंडळाच्या विशेष सभे पुढील कामकाज :-

१. अधिमंडळाच्या विशेष सभेच्या नोटीशीमध्ये अंतर्भुत असलेल्या विषयापुरतेच अधिमंडळाच्या विशेष सभेचे कामकाज मर्यादित राहिल.

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

इ.१.५ अधिमंडळाची वार्षिक सभा व अधिमंडळाची विशेष सभा :-

१. अधिमंडळाची **वार्षिक** सभेची सुचना (नोटीस) सभासदांच्या नोंदलेल्या पत्त्यावर व्यवस्थापक समितीचा अहवाल, ताळेबंद, व नफातोटा पत्रके आणि विषय पत्रिकेसह सभेच्या तारखेच्या १४ दिवसअगोदर पाठविली जाईल.संस्थेने सभेची सुचना , सुचना फलकावर चिटकवून लावली पाहिजे. व त्याची सुचना संस्थेच्या निबंधकाला देण्यात यावी.

२. **अधिमंडळाची** विशेष सभेच्या सुचना पत्रात मागणी केलेल्या विषयांचा अंतर्भाव करुन सभा बोलवली पाहिजे. अशा सभेत विषय पत्रिकेवर फक्त मागणी केलेलाच विषय राहिल.सभासदांचे नोंदलेल्या पत्त्यावर अशी नोटीस सभेच्या तारखेपुर्वी कमीत कमी ७ दिवस अगोदर पाठविली पाहिजे. तसेच सभेची नोटीस संस्थेच्या सुचना फलकावर लावली पाहिजे. व त्याची सुचना संस्थेच्या निबंधकाला देण्यात यावी.

३. कोणत्याही **अधिमंडळाच्या** सभेची नोटीस मिळाली नाही. हे कारण सभा तहकुब करण्यासाठी अथवा पुढे ढकलण्यासाठी पुरेसे नाही.

४. कोणत्याही **अधिमंडळाच्या सभेच्या** नोटीशीत सभेची जागा , तारीख व वेळ यांचा स्पष्ट उल्लेख असेल , तसेच सदरहू नोटीशीत कोरम अभावी तहकूब झालेल्या सभेची जागा, तारीख व वेळ यांचा स्पष्ट उल्लेख असेल.

५. **अधिमंडळाच्या वार्षिक /अधिमंडळाच्या** विशेष सभेची नोटीस व्यवस्थापक / सचिव यांच्या स्वाक्षरीने दिली जाईल.

इ.१.६ अधिमंडळाची वार्षिक सभा व अधिमंडळाची विशेष सभा गणपूर्ती (कोरम) :-

कोणत्याही **अधिमंडळाच्या** सभेस एकूण सभासद संख्याच्या १/५ अगर २५ या पैकी संख्या कमी असेल इतके सभासद हजर असेल म्हणजे गणपूर्ती झाली असे समजणेत येईल.

इ.१.७ अधिमंडळाची वार्षिक सभेची तहकुबी आणि अधिमंडळाची विशेष सभा रद्द करणे :-

जर **अधिमंडळाची** वार्षिक सभा गणपूर्ती अभावी होऊ शकली नाही तर नोटीशीत नमुद केल्याप्रमाणे अर्ध्या तासासाठी तहकूब केली जाईल. अशी तहकूब केलेली सभा नंतर भरल्यावर संस्थेच्या मूळ विषय पत्रिकेमध्ये समाविष्ट केलेल्या विषयावर गणपूर्ती (कोरम) असो अगर नसो विचार केला जाईल.

इ.१.८ अधिमंडळाच्या सभेचे अध्यक्ष :-

संस्थेचे अध्यक्ष **अधिमंडळाच्या** सभेचे अध्यक्षअसतील. त्यांचे गैरहजरीत उपाध्यक्ष सभेचे अध्यक्षस्थान स्विकारतील. दोघांच्या गैरहजेरीत हजर असलेले व मतदानाचा हक्क असलेले सभासद आपल्यापैकी एकाची निवड सभेच्या अध्यक्ष म्हणून करतील.

इ.१.९ मतदानाचा अधिकार :-

१. कितीही भागधारण केले असले तरी प्रत्येक सभासदांला फक्त एकच मत देण्याचा अधिकार राहिल.

२. समसमान मताचे प्रसंगी सभेच्या अध्यक्षास सभासद म्हणून असलेल्या मताशिवाय एक निर्णायक मत राहिल.

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

इ.१.१० ठराव :-

एखादा ठराव मंजूर करताना सभेत उपस्थित असलेल्या क्रियाशिल सभासदांनी ठरविल्यानुसार मतदान घेण्यात येईल. हात वर करुन मताधिक्य आजमवले जाईल किंवा गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्यात येईल.

निबंधक यांनी खास सुचना केल्याशिवाय किंवा त्यांची पुर्ण संम्मती असल्याशिवाय **अधिमंडळाच्या** सभेत ६ महिन्याचे आत पुर्वीचे **अधिमंडळाच्या** सभेत मंजूर झालेला ठराव पुनर्विचारासाठी मांडता येणार नाही.

इ.१.११ इतिवृत्त :-

अधिमंडळाच्या सभेचे इतिवृत्त **अधिमंडळाची**सभा झाल्यापासून एक महिन्याच्या आत लिहिले पाहिजे आणि त्यासाठी सदर इतिवृत्ताची नोंद व्यवस्थापक समितीच्या सभेमध्ये घेतली पाहिजे.

फ व्यवस्था

फ.१.१ व्यवस्थापक समिती :-

व्यवस्थापक समिती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व १९६१ अन्वये खालील प्रमाणे १७ पेक्षा कमी सदस्याचे राहिल.

१. संस्थेच्या सभासदातून सभासदांनी निवडलेले सदस्य.	----	८
२. अनुसुचित जाती / जमाती सभासदासाठी राखीव जागा.	----	१
३. महिला प्रतिनिधी राखीव जागा.	----	२
४. इतर मागासवर्गीयांसाठी राखीव.	----	१
५. भटक्या विमुक्त जाती /जमाती व विशेष मागास प्रवर्ग राखीव.	----	१
एकूण	----	१३
६. तज्ञ संचालक.	----	२
७. कार्यलक्षी संचालक.	----	१

किंवा २

टिपः- तज्ञ संचालक व कार्यरत संचालक यांना पदाधिकारी निवडणूकीमध्ये मतदानाचा अधिकार असणार नाही. मात्र तज्ञ संचालक यांना संस्थच्या व्यवसायच्या अनुशंगाने कामकाजात ठराव व निर्णय यामध्ये त्यांचे मत ग्राह्य धरले जाईल.

तसेच कार्यलक्षी संचालक यांना सभेमध्ये आलेल्या विषयांच्या अनुशंगाने ते आपले म्हणणे (Opinion) मांडू शकतील वा ठरावा बद्दल आपले अभिप्राय नोंदऊ शकतील.

कार्यलक्षी संचालकाची संख्या एक असल्यास संस्थेचा मुख्य प्रशासकीय अधिकारी जो मुख्य कार्यकारी अधिकारी / महाव्यवस्थापक / व्यवस्थापक /सचिव / चिटणीस किंवा इतर पदनाम धारण केलेला अधिकारी हाच कार्यलक्षी संचालक असेल. संचालक मंडाळाची संख्या १७ ते २१ एवढी असल्यास संस्थेवर दोन कार्यलक्षी संचालक असतील.

सचिव

चेअरमन

...शर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

<u>स्पष्टीकरण</u>

<u>अ.</u> राखीव जागेस पात्र अनुसुचित जाती, जमातीच्या सभासदांचा राखीव जागेसाठी निवडणूक लढविण्याचा हक्क राहिल. व्यवस्थापक समितीचे निवडणूक मतदान करण्याचा हक्क असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस राखीव जागेचा निवडणूकीत मतदान करता येईल.

<u>ब.</u> वरील राखीव जागेसाठी कोणीही सभासद निवडण्यात आला नाही. तर निडणूकीनंतर झालेल्या व्यवसथापक समितीच्या सभेत फ.१.१ मधील (२) ते (५) नुसार निवडणूक लढविण्यास पात्र असलेल्या सभासदातून ह्या जागा नामनिर्देशनाने भरण्यात येतील.

तज्ञ संचालक याचा अर्थ सनदी लेखापाल किंवा बँकींग , व्यवस्थापन , वित्तसंस्था या क्षेत्रातील अनुभव असलेली व्यक्ती. असा आहे, आणि त्यामध्ये संस्थेने हाती घेतलेले उद्दिष्टे व कार्य यांच्याशी संबंधीत अन्य कोणत्याही क्षेत्रातील विशेषज्ञता धारण करणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो.

<u>ड.</u> कार्यलक्षी संचालक म्हणजे सचिव / व्यवस्थापक / महाव्यवस्थापक / मुख्यकार्यकारी अधिकारी अथवा संस्थेचा व्यवस्थापनातील अधिकारी.

<u>फ.१.२ व्यवस्थापक समितीची निवडणूक :-</u>

१. व्यवस्थापक समितीची निडणूक राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणा मार्फत घेण्यात येईल.

२. व्यवस्थापक समितीची मुदत निवडणूकीच्या दिनांकापासून ५ वर्ष राहिल.

<u>फ.१.३ पदाधिकारी निवड :-</u>

<u>१.</u> निवडणूक झाल्यानंतर व्यवस्थापक समितीची पहिली सभा एक महिन्याच्या आत बोलविली पाहिजे. निवडून आलेल्या सदस्यामधून अध्यक्ष / उपाध्यक्ष / मानद सचिव / खजिनदार यांची निवड केली जाईल. त्यांची मुदत ५ वर्ष राहिल. व्यवस्थापक समितीच्या सर्व सभांचे अध्यक्ष पद अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत उपाध्यक्ष भुषवितील, आणि दोघांच्या गैरहजरीत व्यवस्थापक समितीचे निवडून आलेले सदस्य आपल्यातून एकाची अध्यक्ष पदासाठी निवड करतील.

<u>२.</u> सभेच्या अध्यक्षास स्वतःच्या मताव्यतीरीक्त एक निर्णायक मत राहिल. या निर्णायक मताचा वापर पदाधिकाऱ्यांच्या निवडणूकीत करता येणार नाही. अशा वेळी निर्णय चिठठा टाकून घेण्यात येईल.

<u>फ.१.४ व्यवस्थापक समिती सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी पात्रता :-</u>

<u>१.</u> व्यवस्थापक समिती निवडणूकीत भाग घेऊ इच्छिणारा सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ (३) ची पुर्तता करीत असला पाहिजे.

<u>२.</u> महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ सी ए व त्याखालील नियम आणि उपविधी यातील तरतुदीनुसार तो निवडणूक लढविण्यास अपात्र असता कामा नये.

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत
संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

<u>फ.१.५ व्यवस्थापक समिती सदस्य पद रिकामे होणे / संपने :-</u>

व्यवस्थापक समितीचे सदस्य पद खालील कारणास्तव संपुष्टात आले असे मानले जाईल.

<u>१.</u> महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ आणि नियम १९६१ चा नियम नुसार अपात्र झाल्यास , तसेच कलम १४७ अन्वये शास्ती झाल्यास.

<u>२.</u> त्याने राजिनामा दिला तर अथवा इतर कारणाने त्याचे सभासत्व नष्ट झाले तर .

<u>३.</u> तो रजा न घेता सलग तीन व्यवस्थापक समितीच्या सभेस सभेची नोटीस मिळूनही गैर हजर राहिल्यास.

<u>४.</u> तो थकबाकीदार असल्यास.

<u>५.</u> त्यास फौजदारी स्वरुपाच्या गुन्हासाठी एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा झाल्यास.

<u>६.</u> क्रियाशिल सभासद न राहिल्यास.

<u>७.</u> महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ अे मधिल तरतुदीनुसार सहकार प्रशिक्षण न घेतल्यास.

<u>८.</u> एकापेक्षा जास्त जागावर निवडून अल्यास त्यापैकी एका जागेव्यतिरिक्त इतर जागांचा राजीनाम १५ दिवसांच्या मुदतीत न दिल्यास.

<u>फ.१.६ व्यवस्थापक समितीवरील रिकामी जागा भरणे :-</u>

<u>१.</u> सदस्यांचा मृत्यु अगर इतर कारणांमुळे समितीवरील सदस्यांच्या रिकाम्या जागा महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ७३ सी बी अन्वये भरण्यात येतील.

<u>फ.१.७ व्यवस्थापक समितीच्या सभा व त्यांची सुचना (नोटीस) :-</u>

जरुरीप्रमाणे व्यवस्थापक समितीच्या सभा बोलविण्यात याव्यात. मात्र महिन्यातून एकतरी सभा झाली पाहिजे. व्यवस्थापक समितीचे सभेच्या सुचना पत्राबरोबर (नोटीस) सभेची विषय पत्रिका टाचणासह सभेच्या कमीत कमी सात दिवस अगोर सर्व व्यवस्थापक समिती सदस्यांना पाठविली पाहिजे.

<u>फ.१.८ गणपुर्ती :- (कोरम)</u>

व्यवस्थापक समितीचे सदस्यापैकी कमीन ५० टक्केपेक्षा जास्त सदस्य हजर असणे म्हणजे गणपुर्ती (कोरम) झाली असे समजावे. मात्र तज्ञ व कार्यरत संचालकांना गणपुर्ती करतांना गणले जाणार नाही.

<u>फ १.९ व्यवस्थापक समितीचे कामे व जबाबदाऱ्या :-</u>

<u>१.</u> नवीन सभासदांना प्रवेश देणे.

<u>२.</u> संस्थेच्या सेवा नियमा प्रमाणेसर्व पगारी नोकराची नेमणूक करणे,वेतन व इतर भत्ते ठरवणे,सेवेत कायम करणे,त्यानां तात्पुरते कामावरून दूरकरणे,दंड करणे , किंवा बडतर्फ करणे .

<u>३.</u> गऱ्हाणी ऐकणे व त्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करणे.

<u>४.</u> कर्जासाठी आलेल्या अर्जाचा विचारकरून मंजूर /नामंजूर या संदर्भात निर्णय घेणे.

<u>५.</u> हिशोबावर देखरेख ठेवणे व ते पडताळून पाहणे.

सचिव चेअरमन
पाराशर शिक्षक सहकारी पत
संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

६ .थकबाकीच्या वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करणे.

७. **अधिमंडळाच्या सभेचा**व्यवहार संभाळणे. आणि मुदतीत दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी दरवर्षी **अधिमंडळाची** वार्षीक सभा घेणे .

८. निश्चित केलेल्या शर्तिनुसार कर्जे उभारणे व ठेवी घेणे.

९. कायदयाच्या चौकटीत राहून संस्थेच्या वतीने दावे दाखल करणे, प्रपिवादी म्हणून दावे चालविणे आणि त्या बाबतीत तडजोड घडवून आणणे.

१०. संस्थेच्या वतीने भाग , सरकारी आणि इतर रोखे विकणे, हस्तांतरण किंवा अन्य रितीने त्या बाबतीत व्यवहार करणे .

११. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ सी मधील अटीस अधिन राहून व्यवस्थापक / सचिव / सेवक यांच्या हाती रोख रक्कम किती असावी याची मर्यादा ठरविणे व संबधित इसमावर त्याची जबाबदारी सोपविणे.

१२. संस्थेकडे आलेल्या रकमा नियमितरित्या बँकेत भरणा केल्या जातात का नाही ते पाहणे.

१३. सहकार खात्याने मागविलेले अहवाल व इतर माहिती वेळेत पाठविण्याची व्यवस्था करणे.

१४. नेमणूक केलेल्या अंतर्गत हिशोब तपासणी साकडून प्रतेक तीन महिन्यांनी संस्थेचे हिशोब तपासून घेणे.

१५. संस्थेचे काम आवश्यक तेनुसार पदाधिका-यात वाटून घेणे व त्यासंबंधी जबाबदारी त्यांचेवर सोपविणे.

१६. नोकरांकडून जामीण आणि त्यांच्या श्रेणी व जामीनकीच्या रकमा ठरविणे, पगारवाढ फंड, ग्रँच्युएटी , बढती इ . सह नियम तयार करणे.

१७. मागील सहकार वर्षाचा १ एप्रिल ते ३१ मार्चचा वार्षीक अहवाल . ताळेबंद जमा खर्च पत्रक , नफा तोटा पत्रक आणि नफ्याची विभागणी इत्यादीचा अहवाल तयार करणे व त्यास मंजुरी देऊन **अधिमंडळाच्या** वार्षीक सभेच्या मंजुरीसाठी ठेवणे.

१८. थकबाकी व अन्य येणे रकमा वसुलीसाठी कार्यवाही करणे.

१९. **अधिमंडळाच्या**सभेच्या संमतीने नोकराकरीता सेवानियम, भविष्य निर्वाह निधीचे नियम तयार करणे, संस्था आपल्या कर्मचाऱ्यासाठी भविष्यनिधी (प्राव्हिडंड फंड) यासाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी यांचेकडे खाते उघडले जातील. या निधीची स्थापणा व त्याची व्यवस्था अधिनयम कलम क्रमांक ७१ व नियम क्रमांक ५६ मधील तरतुदीप्रमाण केले जाईल. व त्या भविष्य निर्वाह निधीस कर्मचारी भविष्य निधी अधिनियम १९५२ प्रमाणे अशा भविष्य निर्वाह निधीचे नियमन त्या अधिनियमान्वये केले जाईल.

२०. विषेश कामा करिता समित्या व उपसमित्या नेमणे आणि व्यावस्थापक समितीला योग्य वाटतील ते अधिकार त्यांना सुपुर्त करणे. त्यांनी केलेल्या सुचनावर व्यावस्थापक समितीच्या सभेत निर्णय घेणे.

सचिव

चेअरमन
श्री पराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

२१. महाराष्ट्र सहकारी संस्थाअधिनियम १९६० वा त्याखाली तयार केलेले नियम आणि उपविधी यांच्या तरतुदीनुसार उभारलेल्या विभिन्न निधीचा विनियोग करणे.

२२. महाराष्ट्र सहकारी संस्थाअधिनियम १९६० कलम ७० आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था नियम १९६१ नियम ५४ व ५५ च्या तरतुदीच्या उपबंधास अधिन राहून संस्थेच्या निधीची गुंतवणूक करणे. निधीची गुतंवणुक सहकारी बँका / राष्ट्रीय बँकां / राज्यसहकारी बँक ज्या बँकेचा या मागील सतत तीन वर्ष लेखापरीक्षण वर्ग अ आहे अशा बँकां मध्ये करणे बंधनकारक राहील.

२३. संस्थेच्या **अधिमंडळाच्या** वार्षिक सभेपुढे लेखापरीक्षण अहवाल ठेवणे.

२४. संस्थेच्या कामकाजाची धोरणे ठरविणे , साधारणतः संस्थेच्या कामकाजाबाबत सारासार विचार करणे, जबाबदारीने व संस्थेच्या हितसंबंधाची जपणूक करून संस्थेच्या निधीची काळजी घेणे आणि सभासंदाच्या व आम जनतेच्या हितसंबधास बाधानआणता संस्थेचा कारभार चालविणे.

२५. संभवनीय बुडीत आणि संशयीत कर्जाची अंदाजे किंमत ठरविणे त्याची तरतूद करणे.

२६. हिशोब तपासणी अहवाल विचारात घेणे आणि हिशोब तपासणीसाने दाखवून दिलेले दोष सुधारणे.

२७. संस्थेच्या हिशोब वहयांमध्ये दाखविलेली रोख बाकी पंधरा दिवसातून एकदा व संस्थेची इतर मालमत्ता महिन्यातून एकदातरी पडताळून पाहण्यासाठी समितिच्या एका सदस्याला त्याच्या नावाने अधिकार देणे. या सदस्याने आपल्या कामाचा अहवाल समितीच्या पुढील सभेत सादर करणे.अशा अहवालात जर रोख बाकी अगर इतर मालमत्तेत तुट असल्याचा उल्लेख केला असेल तर तुटीचु अगर इतर मालमत्तेच्या वसुलीसाठी तत्परतेने कारवाई करणे समितीचे कर्तव्य ठरते . उपरोक्त कारवाई करण्यात जर समितीकडून दिरंगाई झाली तर समितीचे सदस्य सामुदायिक व वैयक्तीक रित्या ती तुट संस्थेस भरून देण्यास जबाबदार राहतील.

२८. समितीच्या सर्व सदस्यांची सेवा विनामुल्य राहील परंतु नियमाप्रमाणे सभा भत्ता , दैनिक भत्ता व प्रवास भत्ता घेता येईल.

२९. ठेविवरील आणि कर्जावरील व्याजदर ठरविणे .त्या अनुषंगाने इतर नियम करणे.

३०. तज्ञ सल्लगार , कायदा सल्लगार व चौकशी अधिकारी अथवा याबाबत कामे करणारी संस्था यांना संस्थेच्या व्यावहारासंबंधी कराराणे नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे .

३१. **अधिमंडळाच्या** वार्षिक सभेच्या परवावगीने संस्थेची जागा भाडयाने घेणे, खरेदी करण्यासाठी करार करणे त्यासाठी आगाऊ भाडे / ठेव व भरपाईची अथवा तारणासहित / विरहित दिर्घ मुदतीच्या उचलीची रक्कम ठरविणे.

३२. वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे व खर्चास मान्यता देणे.

३३. व्यावस्थापक समितीच्या निवडणुकीसबंधी तयारी करणे.

३४. व्यावस्थापक समितीचा कार्यकाल निम्म्यापेक्षा कमी असल्यास समितीवरील तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागा स्वीकृत पध्दतीने भरणे.

सचिव चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि. जालना

३५. योग्य त्या संस्थांचे सभासदत्व घेणे व सलग्न होणे.

३६. आवश्यकतेनुसार विविध संस्थेचे अधिमंडळाच्या वार्षिक सभांना प्रतिनिधी पाठविणे, त्यांच्या समितीवर / संचालक मंडळावर प्रतिनिधी पाठविणे तसेच जरुरीप्रमाणे विविध स्तरावर होना-या चर्चेसाठी , अधिवेशनासाठी प्रतिनिधी पाठविणे.

३७. खालील बाबतीत वेळोवेळी नियम करणे ,त्यात सुधारणा करणे,

अ सर्वप्रकारच्या ठेवी व कर्जाचे नियम

ब कर्मचा-याच्यां नियुक्तीचे / सेवा /बढती नियम व इतर योजना तयार करणे.

क कर्मचा-यांचे प्रवास भत्ते व इतर भत्ते.

ड भविष्य निर्वाह निधी , ग्रॅच्युईटी व बोनस

इ सभासद कल्याण योजना तयार करणे .नियम तयार करणे

ई कर्मचा-यासांठी केलेल्या सेवानियमांना मे. सहाय्यक निबंधकाची मान्यता घेणे.

३८. संस्थेच्या उध्देशास अनुसरून सर्वव्यावहार अंगिकारणे व त्यासाठी प्रशासकीयदृष्टया आवश्यक लागणा-या बाबींची / नियमांची पूर्तता करणे.

३९. संस्थेच्या वतीने करार , वचन चिठी, कर्ज,अर्ज मंजूरी, कर्जरोखे तसेच इतर महत्वाच्या दस्तऐवजावर सहया करण्याचे अधिकार प्रदान करणे.

फ १.१०कर्जाविषयक धोरण :-

१) सर्वसाधारण कर्ज :-

संस्थेकडे उपलब्द असलेले निधी सभासंदाची पात्रता , शासकीय परिपत्रके लक्षात घेऊन व्यावस्थापक समिती आपले कर्ज मर्यादा , कर्जावरील व्याजाचा दर कर्जफेडीचा निश्चीत कालावधी निश्चीत करेल. मा. सहकार आयुक्त व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाचे वेळोवेळच्या परिपत्रकाप्राणे कर्ज धोरण राहील.कर्जफेडीचे जास्तीत जास्त मासिक हप्ते १८० राहतीलसंस्थेने द्यावयाच्या सर्व प्रकारच्या कर्जाचे यवहार अधिनियम कलम क्रमांक ४४ आणि नियम क्रमांक ४१ ते ४३ व ४५ ते ४७ यातील तरतुदीने अधीन राहुन केले जातील संस्थेच्या सदस्यांना व संस्थेच्या कर्मचाऱ्यांना कर्जे दिली जातील.

अ) दिर्घ कर्ज:- प्रत्येक सदस्याच्या पतीवर जास्तीत जास्त एका सदस्यास त्याच्या भागाच्यारक्कमेच्या १० पट अगर पगाराच्या २० पट अगर ५०००००/- रु. या पैकी कमी असणाऱ्या रक्कमे पर्यंत कर्ज देता येईल.

ब) तातडी कर्ज :-

रु ५००००/- पर्यन्त तातडी कर्ज देता येईल परत फेडीचे ७५ हप्ते राहतील. संस्थेच्या एखवादे सभासदावर अचानकपणे नैसर्गीक / दैवी आपत्ती आल्यास अशा सभासदास देता येईल

क) ठेव कर्ज :-

ठेविच्या ८०% पर्यन्तं देता येईल . परत फेडीचे मासिक हप्ते १० ते २५ पर्यन्तराहतील.

१. एकूण सर्व मिळून असणारे सर्वसाधारण कर्ज देय पगराच्या २० पटीपेक्षा जास्त रकमेचे असनार नाही. जर कर्ज कमालमर्यादिपर्यन्तं मंजुर केले तर वसूलकरण्यात येणा-या कर्जाचा

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

हप्ता , व्याज व वेतनातून एकूण करावयाची कपात ही पेमेंट ऑफ वेजेस एक्टप्रमाणे त्याच्या वेतनाच्या २/३ पेक्षा जास्त असणार नाही.अशी खात्री करूनच कर्ज घावे. १०% रक्कम त्याची शेअर्स व कायम ठेव मिळून जमा करावी.

२. व्यावस्थापक समितीला सभासदाच्या गरजेनुसार कर्ज मंजुर करता येईल.

३. ज्या सभासंदाची संस्थेने ठरविलेल्या प्रमाणे संस्थेस येणे रक्कम नियमितपणे येत नसेल तर त्याला कर्ज मागण्याचा अधिकार राहनार नाही.त्याने दरमहाची वर्गणी व इतर येणी पूर्ण केली पाहिजेत.

४. कमीत कमी दोन सभासदांच्या वैयक्तीक जामिनकीवर कर्ज दिले पाहिजे. मात्र एका सभासदास दोनपेक्षा अधिक कर्जदारास जामिन राहता येनार नाही.

५. तातडी कर्ज मंजुर करण्याचा अधिकार संस्थेचे अध्यक्ष /उपाध्यक्ष / सचिव /व्यवस्थापक यापैकी दोघांना संयुक्त पणे राहील .मात्र अशा कर्जास पुढील व्यवस्थापक समितीच्या सभेत मंजुरी घेतली पाहीजे.

६. कर्जावरील व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. मात्र हा व्याजाचा दर दरसाल दरशेकडा १२ ते १५ % राहील. बँकेचे कर्जघेतल्यास बँक ज्या व्याजदराणे कर्जदेते त्या दरापेक्षा १ ते ३ % पर्यन्त ज्यादा व्याजदर ठेवता येईल.

७. सभासदास एकाचवेळी २ पेक्षा जास्त प्रकारचे कर्ज घेता येणार नाही. अधिमंडळाच्या वार्षीक सभेच्या पूर्व मंजूरीने व्यवस्थापक समितीने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार आणि उपविधीत विहित केलेल्या मर्यादांच्या उपबंधास अधिन राहून चालुखाते , बचत खाते किंवा ठराविक मुदतीकरिता ठेवी स्विकारता येतील . चालु बचत अगर मासिक ठेविदारला एक पासबुक दिले पाहिजे. त्यात व्याजाच्या नोंदी घेण्यात याव्यात .तसेच मुदत ठेविच्या पावत्या देण्यात याव्यात.

(अ) मुदतीकरिता ठेवलेल्या ठेवीची मुदत संपल्यानंतर जर ठेवी पुन्हा पुढे नवीन मुदतिकरिता समितीनेस्विकारल्या नसतील तर त्यावर बचत ठेविच्या दराने व्याज दिले जाईल.

(ब) तसेच इतर ठेवीच्या योजना चालू करता येतील.

(क) ठेवीचे व्याजाचे दर व नियम तयार करण्याचा अधिकार व्यावस्थापक समितिला असेल.

(ड) ५०% कर्ज परत फेड झाल्यानंतर सभासंदानां नवीन कर्ज मागणी करता येईल.मात्र नवीन कर्ज मागणी अर्जाना प्रथम प्राधान्य राहील.

फ १.११ व्यवस्थापक समितीचे / उपसमितीचे सभांचे इतिवृत्त :-

त्यासाठी स्वतंत्रपणे ठेवलेल्या पुस्तकात नोंदले जाईल.सदरहून पुस्तकाच्या प्रतेक पानावर अनुक्रमांक नोंदणे आवश्यक आहे.इतिवृतावर त्या सभेच्या अध्यक्षांनी व सचिव / व्यावस्थापक यांनी सह्या केल्या पाहिजे. व सभावृत्तांत लिहून झाल्यावर पुढील सभेत सदर सभावृत्तांत संचालकां नी वाचून मान्य / अमान्य असलेबाबत सभा वृत्तांताखाली स्वाक्षरी केलीच पाहीजे.

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि. जालना

फ १.१२ अध्यक्ष्यांचीकामे :-

व्यवस्थापक समिती / उपसमितीच्या सर्व सभामध्ये अध्यक्ष या नात्याने काम करणे, **अधिमंडळाची सभा व** व्यवस्थापक समिती सभेतील ठरावांची योग्य आमलबजावणी होते की नाही हे पाहणे आणि संस्थेच्या व्यवहारावर देखरेख व पगारी नोकरावर नियत्रंन ठेवणे आणि व्यवस्थापक समितीच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली संस्थेच्या हिताची कामे करणे. इत्यादी अध्यक्षाची कामे राहतील. तसेच उपविधीत सहकारी कायद्याअतंर्गत नोंद असलेल्या व इतरावर जबाबदारी न दिलेली सर्व कामे अध्यक्ष पाहतील.

फ १.१३ सचिव /व्यवस्थापकाची कामे :-

सचिव हा संस्थेचा पगारी कर्मचारी राहील. त्याची नेमणूक कर्मचाऱ्यामधून जेष्ठते नुसार केली जाईल. त्यासंबंधी काही तक्रार असल्यास ती समिती मार्फत **अधिमंडळाच्या**सभेकडे करता येईल.

संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या नियत्रंनाखाली सचिव / व्यवस्थापक यांची कालील कामे राहतील.

१. संस्थेच्या वतीने सर्व पत्रव्यावहार करणे आणि तिच्या सर्व कागदपत्रे व हिशोबाच्या वह्या अद्यावत तयार ठेवणे.

२. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्याची व्यवस्था करणे व त्यापोटी पावत्या व पासबुक देण्याची व्यवस्था करणे.

३. कर्जाचे आणि ठेवी परत मागण्याचे अर्ज स्वीकारणे आणि ते मंजुरीसाठी समितीपुढे ठेवणे , सभेच्या नियमानुसार कार्यवाही करणे आणि पावत्या व इतर व्हाऊचर्स तयार करणे व सभासदांना भाग दाखले देणे.

४. व्यवस्थापक समितीच्या हुकुमान्वये संस्थेच्या वतीने रक्कम स्वीकारणे व तिचा विनियोग करणे आणि रोख रकमेबददल जबाबदार राहणे, व्यवस्थापक समितीने वेळोवेळी पारित केलेल्या ठरावाची अमलबजावणी करणे.

५. हाताखालील कर्मचा-यांच्या नियुक्तीसंबधीचे आदेश व्यवस्थापक समिती / सेवक समिती यांचेकडुन घेऊन त्यांची आमल बजावणी करणे मात्र कर्मचा-यांची संख्या **अधिमंडळाच्या** सभेने एकूण मंजूर केलेल्या संख्येपेक्षा जास्त असनार नाही.तसेच त्यांची वेतनश्रेणी व भत्ते संस्थेने मान्यता दिल्याप्रमाणे असतील.

६. व्यवस्थापक समितीने अथवा अध्यक्षांने दिलेल्या अधिकारानुसार कामे करणे.

७. कर्मचारी वर्गामध्ये कामाची वाटणी करणे, कामकाज सोपविणे व कामकाजावर देखरेख ठेवणे आणि आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्याच्यां बदल्या करणे.

८. स्थायी आदेश / सेवानियमानुसार कर्मचाऱ्या वर शिस्त पालनासाठी योग्य ती कारवाई करणे.

९. कर्मचारी वर्गाचे रजेचे अर्ज ,प्रवास भत्ताबिल ,वैदयकीय बिल व इतर संमत केलेल्या विषयांची बिले मंजुर करणे.

१०. कायदेशीर कारवाई संबधी संस्थेचे प्रतिनिधीत्व करणे.

सचिव
चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

११. संचालक मंडळाने सोपविलेली संस्थेची इतर कामे पार पाडणे.

१२. सहकार विभागाने वेळोवेळी मागविलेल्या माहित्या मुदतीत सादर करणे.

१३. दरवर्षी **अधिमंडळाची** वार्षिक सभा दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी मुदतीत घेणे.

ग नफा वाटणी

ग.१.१ नफा वाटणी :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम ४९ (अ) नुसार संस्थेचा निव्वळ नफा काढला जाईल. संस्थेचा निव्वळ नफा काढतांना तिला झालेल्या ठोक नफ्यातुन पुढील बाबीची वजावट करावयाची आहे.

१. जी कर्जे येणे आहेत व तिची मुदत संपली असून ताळेबंदाच्या दिवसापर्यन्तं ज्या कर्जावर होनारेव्याज (मात्र यात मुदतठेवीवर जी कर्जे घेतली आहेत किंवा सोन्याच्या तारणावरील कर्जे यांचा समावेश करावयाचा नाही.)

२. कर्ज घेतले असल्यास किंवा ठेवी घेतल्या असल्यास त्यावर देय असलेलेव्याज.

३. आस्थापनेचा खर्च (एस्टॅबिलीशमेंट चार्ज)

४. ऑडीट फी किंवा देखरेख फी.

५. दुरुस्ती भाडे आणि कराराचा चालू खर्च

६. घसारा

७. बोनस (अधिलाभांश) अधिनियम १९६५ नुसार नोकरवर्गाना देय असलेला बोनस

८. इन्मक टॅक्स देण्याची तरतूद.

९. राज्य शासनाकडून अधिसुचित करण्यात येईल अशा संघीय संस्थेला घावयाचा शिक्षण निधी.

१०. सहकारी रोजगार निधीस (को ऑपरेटिव्ह एम्प्लॉयमेंट फंड) दयावयाचे अंशदान

११. बुडीत व संशयीत येणे याबाबतची तरतूद.

१२. भागभांडवल परत देण्यासाठी तरतूद.

१३. गुंतणुकीच्या किंमतीत होणा-या चढउतारासाठी तरतुद.

१४. सेवकाच्या निवृत्ती लाभाची तरतूद

१५. मयत सभासद कर्ज निवारन निधी तरतुद.

१६. कोणत्याही कायदयानुसार देय होण्याजोगी मागणी.

१७. संशयीत येणी आणि जमाखर्चाची नुकसानी जी कोणत्याही निधीतून भरपाई केली नाही त्याची तरतूद.

२. राखीव निधीची गुंवणूक व विनियोग महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ५४ मधिल तरतुदी नुसार करण्यात येईल.

सचिव

चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. भोकरदन जि.

<u>३. संचालक मंडळाचे शिफारशीनुसार निव्वळ नफ्याची वाटणी अधिमंडळाच्या वार्षिक सभेत खालील प्रमाणे करण्यात येईल.</u>

<u>अ.</u> सहकार आयुक्त यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या सूचने नुसार नफ्यातील भाग राखीव निधीत जमा केला जाईल . निव्वळ नफ्याच्या २५% राखीव निधीची तरतुद करणे बंधनकारक राहील.व त्याची स्वतंत्र गुंतवणूक मागील सलग ३ वर्ष अ लेखापरीक्षण असलेल्या जिल्हा मध्यवर्ति सह.बँकेत किंवा ईतर बँकेत केली जाईल.

<u>ब.</u> महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीमध्ये नमुद केलेल्या कमाल मर्यादेस पात्र राहुन लाभांष देण्यासाठी तरतुद केली जाईल.

<u>क.</u> इमारत निधी ,मयत वारस मदत निधी,मयत सभासद कर्जनिवारन निधि,धर्मदाय निधी व इतर निधीसाठी उरलेल्या रकमेतून **अधिमंडळाची** वार्षिक सभेच्या .मान्यतेनुसार रक्कम वर्ग केली जाईल.व रक्कम शिल्लक राहिल्यास पुढील वर्षाकरिता वर्ग करण्यात येईल.

<u>ड.</u> महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २४ अे व नियम १९६१ मधील नियम ५३ नुसार राज्यशासनाने अधिसुचित केलेल्या राज्य संघीय संस्थेस शिक्षण निधी दिला पाहिजे.

<u>ग १.२ राखीव निधी :-</u>

<u>१.</u> महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम आणि उपविधी यात नमुद केलेल्या रकमेशिवाय राखीव निधीत प्रवेश फी , नाममात्र सभासद फी , भाग वर्गकरण्याची फी ,जप्तकेलेल्या भागाची रक्कम , जप्त केलेल्या लाभांषाची रक्कम या रकमा जमा केल्या जातील.

<u>२.</u> राखीव निधीची गुंतणुक व विनियोग महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७० मधील तरतुदीनुसार व मा. सहकार आयुक्तांच्या वेळोवेळी प्रसिध्द कलेल्या परिपत्रकाप्रमाणे करता येईल.

<u>ग. १.३ लाभांश :-</u>

<u>१.</u> लाभांषाची रक्कम ही ज्या सहकारी वर्षाशी संबधित असेल त्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३१ मार्च रोजी सदरहून भाग ज्याचे नावाने संस्थेच्या पुस्तकात असतील त्यास देण्यात येईल.

<u>२.</u> भागधारकाची रक्कम जितके महिने संस्थेकडे असेल त्या प्रमाणात तसेच भागाच्या प्रमाणात लाभांश दिला जाईल.

<u>३.</u> लाभांषाची रक्कम संस्थेच्या कार्यालयातून दिली जाईल.

<u>४.</u> लाभांश जाहिर केल्यानंतर तीन वर्षाचे आत न घेतल्यास ती रक्कम जप्त करून राखीव निधीत जमा केली जाईल.

<u>५.</u> न घेतलेला लाभांश अर्ज केल्यानंतर दिला जाईल मात्र तो लाभांश जप्त केलेला नसावा.

सचिव

चेअरमन

श्री पराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

ह दप्तर व हिशोब

ह.१.१ दप्तर व हिशोब :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ मधील नियम ६५ प्रमाणे

१. प्रतेक सहकार वर्ष संपल्यापासून ४५ दिवसाचे आत किवां कोनत्याही संस्थेच्या किंवा संस्थाच्या वर्गाच्या बाबतीत निबंधकाकडून विनिर्दीष्ट करण्यात येईल अशा वाढविलेल्या मुदतीत प्रत्येक संस्थेची समिती पुढील बाबी दर्शविणारे लेखाचे वार्षीक विवरण पत्र तयार करतील.

१. मागील वर्षात जमा झालेल्या व खर्च केलेल्या रकमा

२. त्या वर्षाचे नफातोटा पत्रक

३. वर्षाच्या अखेरीस असल्याप्रमाणे ताळेबंद

संस्थानी ठेवावयाची हिशोब पुस्तके :-

प्रत्येक संस्था पुढील हिशोब व पुस्तके ठेवतील.

(१) नमुना आय मधील नोंदवही.

(२) शेआर्सची नोंदवही .

(३) ऋणपत्रके व रोखे याव्दारे भांडवालाची उभारणी करण्यात आली असेल त्या बाबतीत ऋणपत्रे रोखे नोंद वही.

(४) अधिमंडळाच्या सभेचे कामकाजासंबधीचे सभावृत्तांत पुस्तक.

(५) समितीच्या सभाच्या कामकाजासंबधीचे सभावृत्तांत पुस्तक.

(६) रोकड वही.

(७) सर्वसाधारण खाते वही आणि वैयक्तीक खाते वही.

(८) संग्रह नोंद वही.

(९) मालमत्ता नोंद वही.

(१०) हिशोब तपासणी करतांना घेण्यात आलेल्या हरतकती व त्या सुधारणे याबाबतची नोंद वही.

(११) राज्यशासन कोनत्याही संस्थेसाठी किंवा संस्ताच्या वर्गासाठी विषेश किंवा सर्वसाधारण आदेशाव्दारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे इतर हिशोब आणि पुस्तके.

(१२) दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर क्रियाशील सभासदाची नोंदवही १५ एप्रील पूर्वी तयार करणे.

ह. १.२ लेखापरीक्षण :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे कलम ८१(१) नुसार संस्थेने लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक आहे.

सचिव

चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

ह.१.३ संस्थेची मोहोर (सिल) :-

संस्थेची एक मोहोर (सिल) तयार करण्यात येईल व ती व्यावस्थापक / सचिवांचे ताब्यात राहील. सदरहू मोहोर (सिल) संचालक व्यावस्थापक / सचिवांचे समक्ष संचालक मंडळाचे ठरावाप्रमाणे वापरली जाईल.

ह.१.४ उपविधी दुरूस्ती :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १२ "मध्ये दाखविलेल्या कार्यपध्दतीनुसार उपविधीतील कोनताही भाग बदलता येईल, रदद करता येईल किंवा त्याऐवजी नवीन उपविधी समाविष्ट करता येईल .उपविधी दुरूस्तीचा प्रस्ताव मंजु झालेल्या तारखेपासुन २ महिणुचे आत नोंदणी अधिकाय्राकडे पाठविला पाहिजे.

२. संस्थेचे व्यावस्थापक / सचिव यांनि किर्द वहीवर सह्या केल्या पाहिजे . व्यावस्थापक सचिव व अधिकृ केलेल्या व्यावस्थापक समिती सदस्य रोख शिलकीसाठी संयुक्त रित्या व वैयक्तीक रित्या जबाबदार राहील . त्या प्रत्येकाकडे असलेली रोख रक्कम त्याने किर्द वहीत अक्षरात व अंकां त नोदंली पाहीजे .

३. संस्थेचा व्यावहार बंद करण्याचे वेळी संस्थेच्या अधिक मालमत्तेची विभागणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ११० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम ९० च्या तरतुदीनुसार केला जाईल .

४. संस्थेने (१) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (२) सहकारी बोर्ड (३) महाराष्ट्र सहकारी संघ (४) राज्य / जिल्हा / पगारदार पतसंस्था सहकारी संघ यांची वर्गणी भरून सभासद झाले पाहीजे.

ह.१.६ संस्थेसाठी दस्तऐवजावर सही करण्याची सील करण्याचे आणि त्यांचे बटवारा करण्याची पध्दत :-

१. संस्थेचे अध्यक्ष /उपअध्यक्ष /सचिव /यापैकी कोणाही दोघांच्या संयुक्त सहयाने बँक खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार राहतील .त्याबाबत व्यवस्थापक समिती ठराव करील.

२. संस्थेच्या वतीने कागद पत्रे दस्ताऐवज यावर सह्या करण्याचे व संस्थेच्या वतीने कर्ज रोखे बेचन करून देण्याचे अधिकार वरिल प्रमाणे संयुख्तरित्या व्यवस्थापक समितीच्या ठराव प्रमाणे राहतील.

कर्ज विषयक नियम

अ) प्रत्येक सदस्याच्या पतीवर जास्तीत जास्त एका सदस्यास त्याच्या भागाच्यारक्कमेच्या१0पट अगर पगाराच्या २0 पट अगर ५00000/- रु. या पैकी कमी असणाऱ्या रक्कमे पर्यंत कर्ज देता येईल.

ब) तातडीचे कर्ज रु.५0000/- पर्यंत संस्थेच्या एखादे सभासदावर अचानकपणे नैसर्गीक /दैवीआपत्ती आल्यास अशा सभासदास देता येईल त्याची परत फेड कर्ज देण्यात आल्याच्या

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

दुसऱ्या महिण्यापासून पुढील ७५ सारख्या मासीक हप्त्यात वसूल करण्यात येईल. सर्व सामान्य कर्जाचा हप्ता या व्यतीरीक्त असेल तसेच तातडी कर्जावरही सामान्य कर्जाप्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

खाली दिलेल्या कारणासाठी कोणत्याही सभासदाला कर्ज दिली पाहिजेत.

१) शैक्षणिक कर्ज :- सभासदाच्या अगर त्याच्या कुटुंबातील कोणाही इसमाच्या वैद्यकीय खर्चासाठी.

२) वैद्यकीय खर्चासाठी :- सभासदाच्या अगर त्याच्या कुटुंबातील कोणत्याही इसमाच्या वैद्यकीय खर्चासाठी.

३) लग्नासाठी :- सभासदाच्या स्वतःच्या अगर त्याच्या कुटुंबातील कोणाही इसमाच्या लग्नासाठी लागणाऱ्या खर्चासाठी.

४) घर बांधणी कर्ज :- राहण्याकरिता घर विकत घेण्यासाठी, खाली जागा विकत घेण्यासाठी , घराचे बांधकाम करण्यासाठी.

५) नित्योपयोगी वस्तु खरेदी कर्ज :- दुचाकी वाहन,फर्निचर ,टि.व्ही ,फ्रिज, पंखे,मिक्सर शिलाई मशीन, कुलर, वासिंग मशीन व्हीसीआर , व्ही.सी.डी. प्लेअर , कॉम्प्युटर व इतर घरगुती वापरासाठी आवश्यक असलेल्या वस्तु खरेदी करण्यासाठी.

घरबांधकामासाठी कर्ज घ्यावयाचे असल्यास खालील कागदपत्राची पुर्तता करुन द्यावी लागेल.

१) जागेची रजिस्टरी.

२) जागेच्या मालकी हक्का संबधीचा नगरपालीका / ग्रामपंचायचे नमुना नं.८ / सातबारा.

३) नगरपालीका / ग्रामपंचायचे बांधकाम परवाना.

४) अधिकृत बांधकाम तज्ञ यांनी तयार केलेला व नगरपालीका / ग्रामपंचायत यांनी मान्य केलेला बांधकामसाठीचा प्रस्तावीत घराचा नकाशा.

५) अधिकृत बांधकाम तज्ञ यांनी दिलेले बांधकाम खर्चाचे अंदाज पत्रक.

६) अधिकृत वकीलाचे जागेचा कायदेशीर हस्तांतरणसाठी वीस वर्षाचा सर्च रिपोर्ट.

७) जागेचे गहाण खत संस्थेच्या नावे करुन दयावे लागेल.

८) जागेचा प्लॉटींग लेआऊट नकाशा.

९) जिल्हाअधिकारी यांचे एन.ए. परवानगीचे पत्र.

१०) पगारपत्रक कपाती हमी बाबतचे पत्र.

११) दोन जामीनदार (पगार पत्रकासह)

अंदाज पत्रकाच्या १५ % रक्कम मार्जीन मनी म्हणून जमा करावी लागेल.

मुदत :- १५ वर्ष किंवा सेवानिवृत्ती पर्यंत यातील जे कमी असेल तवढे हप्ते.

सचिव चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत

<u>कर्ज मर्यादा:-</u> ३३% रक्कम संबधीतांना मिळेल हे पाहून राहीलेल्या रक्कमेचा व सेवानिवृत्तीचे महीने किंवा १५ वर्ष या पैकी कमी असलेल्या मासिक हप्ता बसेल त्यानुसार किंवा अंदाज पत्रकाच्या ८५% किंवा संस्थेची अधोरेखीत कर्ज मर्यादा या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढे कर्ज मंजूर करता येईल.

<u>पाहणी करुन व बांधकाम तज्ञाच्या प्रमाणपत्रानूसार</u>

१)	खोदकाम पायावर प्रथमिक मटरीयलसाठी:-	१०%
२)	ओटा लेव्हलवर बांधकामानंतर:-	२०%
३)	विट बांधकाम झाल्यावर:-	२०%
४)	स्लॅाप बांधकाम झाल्यावर:-	२०%
५)	प्लॉस्टर पुर्ण झाल्यावर:-	१०%
६)	फ्लोटींग , प्लंबींग सेनटरी इत्यादी कामे पुर्ण झाल्यावर:-	१०%
७)	बांधकाम पुर्ण झाल्यावर बांधकाम तज्ञाने बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर संसथेच्या कर्जाचा बोजा	
८)	मालमत्तेवर नोंद झाल्यावर:-	१०%

कर्ज घेतल्याच्या तारखेपासून सारख्या कमाल १५० मासिक हप्त्यात प्रत्येक सदस्याने आपल्यान कर्जाची परतफेड केली पाहिजे. जरुरीप्रमाणे सदर हप्त्यांची संख्या १८० पर्यंत वाढविण्याचा समितीस अधिकार राहिल.

संस्थेने सभासदांना वाटप केलेल्या कर्जावरील व्याजाचा दर द.सा.द.शे. १२ % राहील. अनाधिकाराने थकलेल्या रक्कमेवर ठरलेल्या व्याज दरापेक्षा द.सा.द.शे. ३ % प्रमाणे जादा व्याज आकारले जाईल. व्याजाची आकारणी कर्ज दिलेच्या तारखेपासून ते कर्ज फेडीच्या तारखे पर्यंत दर दिवसाप्रमाणे दरमहा केली जाईल. अपुर्ण महिन्या बद्दल त्या होणाऱ्या दिवसात परदिवसा प्रमाणे व्याज आकारले जाईल. वरील प्रमाणे असलेल्या व्याज दरात संस्थेच्या परिस्तीथीनुसार ३ % पर्यंत व्याज दर कमी जास्त करण्याचा अधिकार समितीस राहिल.

<u>नियम क्रं.१</u> या नियमाला पतसंस्थेचे कर्जविषयक नियम असे संबोधण्यात येईल व हे नियम नोदंणी अधिका-यांनी नोदंणी दिल्यानंतर अमलात येतील. संस्थेकडून कर्ज मिळविण्यासाठी संस्थेने विहीत नमुण्यात अर्ज करावा लागेल . सदर अर्जात खालील बाबींचा समावेश असेल.

<u>नियम क्रं.२</u> <u>१.</u> अर्जदाराचे संपूर्ण नाव ,व्यावसाय, पत्रव्यावहाराचा पत्ता ,राहण्याचे ठिकाण व गाव .

<u>२.</u> कर्जाची रक्कम

<u>३.</u> कर्जाचा उध्देश

<u>४.</u> कर्जफिडीचा कालावधी व प्रकार

<u>५.</u> कर्जदारचे दरमहा उत्पन्न (आवश्यक असेल त्यावेळी कुटुंबियांचे दरमहाउत्पन्न)

र.नं. JLN/BDN/ BKN/801 दि.25/10/83

सचिव चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

६. जामीनदारचे संपूर्ण नाव , व्यावसाय , पत्रव्यावहाराचा पत्ता ,राहण्याचे ठिकाण व गाव , जामीनदारचे मासिक उत्पन्न व त्याबरोबर जामीनदाराचे जामीनाबाबतचे संमतीपत्रक .

७. इतर तारणाचा प्रकार व वर्णन.

८. जर अर्जदार अथवा जामीनदार इतर बँकां चा अथवा पतसंस्थाचा सभासद असेल तर त्याचे दायित्व.

९. व्यवस्थापक समितीस अधिक माहिती हवी असल्यास ती माहिती.

नियम क्रं.३ संस्थेकडे कर्ज मिळण्यासाठी आलेले अर्ज त्यासाठीच्या अर्ज नोंदवहीत येतील व त्यात अर्जाचा दिनांक अर्जदारचेनाव व कर्जाचा प्रकार ,मागणी केलेल्या कर्जाची रक्कम नोदंण्यात येईल.

नियम क्रं.४ अशा अर्जाची संस्थेच्या कर्मचा-यामार्फत (सचिव / व्यावस्थापक इत्यदी) योग्यरित्या छाननी झाल्यानंतर ते व्यवस्थापक समितीसमोर सादर केले जातील.

नियम क्रं.५ व्यावस्थापक समिती अर्जदारकडून अथवा जामिनदारकडून आवश्यक असणारी , अतिरिक्त माहिती मागवू शकेल अथवा आवश्यक ती चौकशी करू शकेल.

नियम क्रं.६ व्यावस्थापक समितीने कर्ज नामंजूर केल्याच्या तारखेपासून तसे तिन महिन्यात अर्जदारास कळविण्यात येईल.

नियम क्रं.७ कर्ज मंजुर केल्यानंतर चूकीची माहिती देऊन अथवा दिशाभुल करून कर्ज मंजुर केले आहे असे निदर्शनास आल्यास मंजुर कर्ज व्यवस्थापक समिती संपूर्ण कर्ज एक रकमेने परत मागण्याचा अधिकार राहील.

नियम क्रं.८ कर्ज मंजुरीनंतर कर्जदाराणे ३ महिण्याच्या कालावधीत कर्ज रकमेची उचल न केल्यास सदरची कर्ज मंजुरी आपोआप रदद होईल.

नियम क्रं.९ कर्ज घेण्यापुर्वी कर्ज घेणाऱ्या सदस्याने दुसऱ्या संस्थेकडून कर्ज घेतले नाही, याची खात्री करुन दिली पाहिजे.

नियम क्रं.१० जर एकाद्या कर्जदाराने कर्ज फेडीची ३ अगर जास्त हप्ते थकविले अगर उपविधी नुसार तो संस्थेतून कमी झाला अगर त्याने दुसऱ्या कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून कर्ज काढले तर त्याच्याकडील सर्व कर्ज ताबडतोब परतफेड करुन घेण्यास समितीचा अधिकार राहिल.

नियम क्रं.११ कर्ज फेडीची मुदत संपल्यानंतर कर्ज वसूल न झाल्यास व कर्जास तहकुबी दिली नसल्यास अगर त्याचे कर्ज एन.पी.ए. झाल्यास त्याचे जामीनदार यांना कर्ज वसूलीची नोटीस देण्यात येईल. नोटीशीत नमुद केलेल्या मुदतीत रक्कम भरली पाहिजे असा आदेश नोटीशीत दिला जाईल.सदर मुदतीत समाधानकारक वसूल न आल्यास त्या कर्जदारावर लवाद दावा दाखल केला जाईल. लवादाने कर्जदारा विरुध दिलेल्या निवाड्यावर अपील केले नसल्यास अगर पैसे भरण्या बद्दल हुकूमनाम्यात मुदत दिली नसल्यास अगर हुकूम नामा झाल्यानंतर समाधानकारक वसूल आलानसल्यास तो हुकूमनामा ताबडतोब बजावणिस पाठविला जाईल. तो पाठविण्याची जबाबदारी समितीवर राहिल. अपीलात मिळालेल्या बजावणी बाबतही याप्रमाणेच कार्यवाही केली जाईल. अशा प्रकारच्या

सचिव चेअरमन
श्री पाराशर शिक्षक सहकारी पत

कार्यवाहीतून कर्जाची वसूली केलेल्या सभासदास पुढे कोणत्याही प्रकारचे कर्ज दिले जाणार नाही.

नियम क्रं.१२ संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची अगर जामीनकीची जबाबदारी संपेपर्यंत मी माझ्या सध्याच्या नौकरीचा राजीनामा देणार नाही. अशा अर्जाचा करारनामा प्रत्येक कर्जदाराने कर्ज घेण्यापुर्वी करुन दिला पाहिजे.

वरील तरतुदी विचारात घेऊन प्रत्येक कर्ज घेणाऱ्या सदस्याकडून कर्ज रोखा अगर गहाणखत अगर दोन्ही प्रथम लिहून घेतले जातील. त्यानंतरच प्रत्यक्ष कर्जाची रक्कम दिली जाईल.

कर्ज फेडीसाठी कर्ज रोख्यात ठरविलेल्या तारखेच्या दिवशी अगर दिलेल्या मुदतीच्या अखेरच्या दिवशी कर्जाच्या रक्कमरची फेड न झाल्यास ती तारीख त्या थकबाकीची तारीख समजली जाईल.

ठेवी चे नियम

नियम क्रं.१ मासिक बचत ठेवी व मासिक आवर्ति ठेवी , बचत सेविंग ठेवी, सदस्याकडून अगर नाममात्र सदस्यांकडून संस्थेस स्विकारता येतील.

नियम क्रं.२ बचत ठेवीचे व मासिक आवर्ति ठेवीचे व्यवहार खालील अटीवर केले जातील.

१) कोणत्याही ठेवीदाराच्या नावावर असलेल्या रक्कमेस मर्यादा असणार नाही.

२) एकावेळी ठेवल्या जाणाऱ्या ठेवीची रक्कम १००/- रुपये पेक्षा कमी असणार नाही.

३) कोणत्याही एका इंग्रजी महिन्यात २ पेक्षा अधिक वेळा रक्कम काढता येणार नाही.

४) कोणत्याही एका वेळी १००/- रुपये पेक्षा कमी रक्कम काढता येणार नाही.

५) ठेवीचे खाते सुरु करतांना ठेवीदारास पासबुक देण्यात येईल. ते संपुर्ण भरल्यावर दुसरे पासबुक देण्यात येईल. पासबुक गहाळ झाल्यास रुपये ५ /- फी दिल्याशिवाय नवीन पासबुक दिले जाणार नाही.

६) अशा ठेवींना द.सा.द.शे. १० % प्रमाणे व्याज दिले जाईल. प्रत्येक इंग्रजी महिन्याच्या दुसऱ्या तारखेपासून तर शेवटच्या तारखेपर्यंत ठेवीदाराच्या नावावर असलेल्या कमीत कमी रक्कमेवर व्याज आकारले जाईल. त्रैमासिक पध्दतीने ठेवीवर जमा होणारे व्याज त्या ठेवीदाराच्या खात्यात जमा केले जाईल.

अ :- १०० रु. च्या पटीत कोणालाही आपले आवर्ती ठेवीचे खाते संस्थेतउघडता येईल. दर महा नियमीत हप्ता भरावा लागेल.

ब :- खात्याची मुदत ६० महीने राहील.

क :- मुदती पुर्वी रक्कम काढणे असल्यास

१) :- १२ महीने पर्यंत आर.डी. परत करता येणार नाही.परंतु अत्यंत अडचणीच्या प्रसंगी रक्कम हवी असल्यास देता येईल त्यावर १२ महिने पर्यंत ४ % व्याज देण्यात येईल.

२) :- १२ महीने नंतर ३६ महीने पर्यंत ७ %

सचिव चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

३) :- ३६ महीने नंतर ६० महीनेच्या आत ८ %

४) :- पुर्ण ६० महीने संपल्यानंतरच्या एक महीन्या नंतर १० % या प्रमाणे व्याज देण्यात येईल.

५) :- खात्यातुन मुदती पर्यंत फक्त तीन वेळेस रक्कम काढता येईल.

ख :- खाते दुसऱ्याच्या नावावर हस्तांतरीत करता येणार नाही.

ग :- मयत सदस्यांच्या बाबतीत वारसाच्या प्रमाण पत्रानुसार वारसास रक्कम देण्यात येईल.

घ :- मासिक हप्ता शेवटच्या तारखे पर्यंत न आल्यास त्या प्रमाणे व्याज कमी दिले जाईल.

च :- खात्यातुन पैसे काढते वेळेस लेखी अर्ज व रेव्हीनू टिकीट लावुन पावती द्यावी लागेल.

छ :- रक्कम शक्यतो चेकनेच दिली जाईल.

ज) ठेवीतून १००/-रुपये पेक्षा जास्त रक्कम काढण्या बद्दलची तीन दिवसा आधी लेखी सुचना ठेवीदाराने दिली पाहिजे.

झ) ठेवीचे खाते सुरु करतांना ठेवीदाराने ठरावीक नमुन्यात अर्ज केला पाहिजेत. व आपल्या सहीचे नमुने दिले पाहिजेत. रक्कम परत घेतांना ठेवीदाराने ठरावीक नमुन्यात पावती लिहून दिल्याशिवाय व तिच्यावर नमुन्याप्रमाणे सही केल्याशिवाय कोणतेही ठेव परत केली जाणार नाही.

ट) वरील प्रमाणे असलेल्या व्याज दरात ३ % पर्यंत कमीजास्त करण्याचा अधिकार समितीस राहिल.

नियम क्रं.३ एका महिन्यावून कमी नाहीत अशा मुदतीच्या ठेवी संस्थेस स्विकारता येतील.उपविधी क्रमांक ७३ (८) मधील तरतुदी अशा ठेवींनाही लागू राहतील त्रेमासिक पध्दतीने ठेवीवर जमा होणारे व्याज त्या ठेवीदाराच्या खात्यात जमा केले जाईल. अशा ठेवीवरील व्याजदर द.सा.द.शे. खालील प्रमाणे राहिल.

अनुक्रमांक	मुदती ठेवी द.सा.द.शे.	व्याज दर
१	३१ दिवस ते ९१ दिवस आत	८%
२	९१ दिवस ते ६ महिणे आत	९%
३	६ महिणे ते १ वर्षा आत	१०%
४	१ वर्ष ते ३ वर्षा आत	११%
५	३ वर्ष ते ५ वर्ष आत	१२%
६	५ वर्ष ते त्याहून अधिक	१३%

सचिव

चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

परिस्थिती नुसार वरील प्रमाणे असलेल्या मुदती ठेवीचा व्याजदर ३ % पर्यंत कमी जास्त करण्याचा अधिकार संचालक मंडळास राहिल. मुदती पुर्वी ठेव परत केली जाणार नाही. अत्यंत निकडीच्या आपल्या परिस्थितीची ठेवी दाराने खात्री करुन दिल्यास ठेव परत करता येईल. मुदती ठेवी मुदतीपुर्वी परत करावयाची असलेल्या प्रमाण पत्रावर दिलेल्या व्याज दराच्या १ % कमी किंवा त्या कालावधीचा व्याज दर या पैकी कमी असलेल्या व्याज दराने आकारणी करुन मुदती ठेवी मुदतीपुर्वी परत केल्या जातील.

नियम क्रं.४ ठेवी खात्रीने वेळीच परत करता याव्यात म्हणून तात्काळ पैसा (फ्ल्यूईड रिसोर्सेस) हाती यावा अशा तऱ्हेने नियम क्रमांक ४१ मधील तरतुदींना आधीन राहून आपल्या भांडवलाची गुंतवणूक संस्थेने केली पाहिजे.

निवडणुक

संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणुक दर पाच वर्षानी राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण घेईल तत्पूर्वी वेळेत व्यवस्थापक / सचिव यांनी क्रियाशील सभासदांची यादि तयार करून निवडणुक आयोग / प्राधिकरण यांना सादर करणे आवश्यक व बंधनकारक राहील.

(र.न.जे.एल.एन./बी.डी.एन./बी.के.एन./८०१ दिनांक :- २५/१०/१९८३)

तारीख / / माहे सन

समिती सदस्य

सचिव

चेअरमन

श्री पाराशर शिक्षक सहकारी पत संस्था मर्या.भोकरदन जि.जालना

ज्ञापन /जा.क्र. /524/सानिभो/प्र.१/.......

दि 25-10-2013 अन्वये

मान्य व नोंदविले.

सहायक निबंधक

सहकारी संस्था ता.भोकरदन